भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायकांळ)

जा.क्र. ५६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०१/२०१७

**१) धानाच्या पोत्यामध्ये पाणी शिरले याकारणावरुन संगनमत करुन अश्लिल शब्दात शिविगाळ करुन धमकी दिली . :—**

दि. २२/०१/२०१७ चे १४.३० वा. दर. यातील चारी आरोपीतांनी संगनमत करुन सार्वजनीक रोडावर फिर्यादीचे घरासमोर जावुन फिर्यादीस व तिचे पतीला पाणी सोडल्या व आमचे धानाचे पोत्यामध्ये पाणी शिरले याकारणावरुन फिर्यादीला अश्लिल शब्दात शिविगाळ करुन घराबाहेर निघ तुला मजा दाखवितो. असे बोलुन धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २९४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**२) चारचाकी वाहनाची मोटार सायकलला धडक दिल्याने एक जखमी . : —**

दिनांक २१/०१/२०१७ चे १९.३० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादी मनोहर इसन कुथे वय ६० वर्ष, रा. कमकाझरी याचा मुलगा अरुण कुथे वय ३५ वर्ष, हा झेराक्स काढण्याकरीता त्याचे मोटार सायकलला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नंदेश्वर पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहेत.

**३) गळफास लावुन इसमाचा मृत्यु . :—**

दिंनाक २२/०१/२०१७ रोजी १२.०० वा. दर. यातील मृतक किशोर नानु टेंभुर्णे वय ५२ वर्ष, रा. मुरमाडी तुपकर याने कोणीही घरी हजर नसतांनी प्रकृतीला कंटाळुन घराच्या पंख्याला नॉयलान दोरीने स्वत: गळफास लावुन मरण पावल्याने फिर्यादी ज्ञानेवर विष्णुजी देशकर वय ३५ वर्ष, रा. मुरमाडी तुपकर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पालांदुर येथे मर्ग क्र. कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोले पो. स्टे. पालांदुर हे करीत आहे.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५१०११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.